। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON - 425001
रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५
1990
Grade-B(2.88)
NAAC Re-Accredited

जा.क्र.उमवि/५/नुतनी/नै.वि.२०१५-१६/ डी.ओ. 8 / 198 /२०१५ दिनांक : 11-05-2015

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील कॉलेज ऑफ फार्मसी चोपडा
ता. चोपडा जि. जळगाव

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराच्या मान्यतेबाबत**

संदर्भ :- १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी / नैसर्गिक विस्तारासाठी [Continuation of Affiliation / Natural Growth] माहे, ऑक्टोबर २०१४ मध्ये सादर केलेला प्रस्ताव

२) विद्यापीठाचे पत्र क्रमांक उमवि/५/नुतनी/नै.वि.२०१५-१६/ डी.ओ. 8 / 185 /२०१५ दिनांक 27-04-2015 [Manyata Letter]

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास / नैसर्गिक विस्तारास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय पत्र क्रमांक ०१ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयास / मान्यताप्राप्त परिसंस्थेस संदर्भीय पत्र क्रमांक ०२ व त्यासोबत जोडलेल्या तक्त्यातील रकाना क्रमांक ०२, ०३ व ०४ मध्ये नमूद केलेल्या विषय / अभ्यासक्रमाच्या संल्गनीकरणाच्या नुतनीकरणास / नैसर्गिक विस्तारास महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ चे कलम ८३(४) नुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ या एका वर्षाकरिता मान्यता प्रदान करण्यांत आलेली असून, विद्यार्थी प्रवेशाबाबत सदर तक्त्यातील रकाना क्रमांक ०६ मध्ये शिफारस करण्यांत आलेली आहे.

आपणांस विदीत करण्यांत येते की, आपल्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संलग्निकरणाच्या नुतनीकरणासंदर्भात / नैसर्गिक विस्तारासंदर्भात नियुक्त करण्यांत आलेल्या स्थानिक चौकशी समितीने, संदर्भीय पत्र क्रमांक ०२ मधील तुकड्या / विषय / अभ्यासक्रम / शाखा इत्यादी संदर्भात त्यांचे अहवालात अटी/ शर्ती नमूद केलेल्या असून, सदरच्या अटी/ शर्ती सोबतच्या तक्त्यात नमूद करण्यांत येत आहे.

आपणांस असेही विदीत करण्यांत येते की,महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ चे कलम ८१ नुसार संलग्नीकरणासाठी विद्यापीठाने सूचीत केलेल्या अटी / त्रुटींची पूर्तता करणे आपणांस बंधनकारक असून, त्याअनुषंगाने आपणांस विनंती करण्यांत येते की आपल्या महाविद्यालयासंदर्भात / मान्यताप्राप्त परिसंस्थेसंदर्भात नमूद केलेल्या अटी / त्रुटींचे अवलोकन करून सदरच्या अटी / त्रुटींची परिपूर्ण स्वरूपात पूर्तता करावी व आवश्यक त्या कागदपत्रांसह अटी पूर्तता अहवाल ०६ महिन्यात, तथापी, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर होईल अशा बेताने पाठवावा. आपण सदर मुदतीत अटी पूर्तता अहवाल सादर न केल्यास, आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता प्रवेशीत होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज कोणत्याही सबबीवर स्विकारले जाणार नाही तसेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिताचे कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यांत येणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जवाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

तसेच ज्या संबंधीत महाविद्यालयांच्या केसेस अद्याप मे. कोर्टात प्रलंबीत आहेत, अशा महाविद्यालयांच्या बाबतीत मे. कोर्टाच्या आदेशाच्या अधीन राहून कार्यवाही करण्यांत येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपणांस पुन:श्च कळविण्यांत येते की, विद्यापीठाच्या संदर्भीय पत्र क्रमांक ०२ अन्वये **ज्या पदवी / पद्व्युत्तर अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता "No Admission" असे नमूद केलेले आहे, अशा अभ्यासक्रमांना आपण विद्यार्थी प्रवेशीत करू नयेत.** अशा अभ्यासक्रमांना आपण विद्यार्थी प्रवेशीत केल्यास, त्याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी, हि विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

SNe
27/5

(ग. ना. पवार )
उपकुलसचिव, बीसीयुडी, उमवि, जळगांव

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तारासंदर्भात स्थानिक चौकशी समितीने घालून दिलेल्या अटी/त्रुटींचा तक्ता.

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा. परीक्षा नियंत्रक, उ.म.वि., जळगांव.

२) मा. उप/सहा. कुलसचिव, संबंधीत विद्याशाखा, परीक्षा विभाग, उ.म.वि., जळगांव

३) मा. पद्धती विश्लेषक, संगणक विभाग, उ.म.वि., जळगांव

जा.क्र. उमवि/५/नुतनी/नै.वि.२०१५-१६/ डी.ओ. 8/ 198/२०१५, दिनांक : 11-05-2015 चे सहपत्र

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तारासंदर्भात स्थानिक चौकशी समितीने घालून दिलेल्या अटी / त्रुटींचा तक्ता

| Name of College / Recognized Institute | A] Observations of Present LIC<br>B] Conditions of Previous LIC<br>C] Conditions of Present LIC |
|---|---|
| 01 | 02 |
| [E140046] - MAHATMA GHANDHI SHIKSHAN MANDAL SMT SHARADCHANDRIKA SURESH PATIL COLLEGE OF PHARMACY CHOPDA<br>Tal. Chopda Dist. Jalgaon | A] The Institute is having sufficient number of laboratories, class rooms, Library and reading room as required for B. Pharm. and M. Pharm. Course.<br>All Laboratories are well maintained<br>Internet, Xerox and Drinking water facilities are provided by Institute |
| | B] 1) One Associate Professor in Pharmacognosy (PG), One regular Librarian & Physical Director Should be appointed. Library should be upgrade with necessary volumens & titles as per the norms |
| | C] 1. Regular Principal, Librarian and Physical Director should be appointed and get approval from University. 2. One regular Associate Professor in Pharmacognosy (PG) should be appointed. 3. Additional books of worth Rs. 50000 be purchased |

(ग. ना. पवार )
उपकुलसचिव, बीसीयुडी, उमवि, जळगांव